# महाराष्ट्र शासन
## शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचे कार्यालय

१७, डॉ.आंबेडकर मार्ग, लाल देवळासमोर, पुणे -१
फॅक्स क्रमांक ०२०-२६१२२२१७
दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२५६९६
वेब साईट आयडी क्रमांक www.dydepune.com
ई मेल आय.डी.क्र dydpune@gmail.com

जा.क्रं. शिऊसं/उमाशि-४०२/खाते मान्यता/पुवि/२०२०/ 8826

दिनांक : /१०/२०२०
22 OCT 2020

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, पुणे / सोलापूर / अहमदनगर

विषय :- महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा स्थापना व विनियिम अधिनियम २०१२ अंतर्गत नविन शाळा स्थापन करणे तसेच विदयमान शाळेचा दर्जावाढ साठी खात्याची मान्यता देण्याबाबत.

संदर्भ :- १) माध्यमिक शाळा संहिता नियम ४.१ व ४.२ आणि ५.१ व ५.२
२) शासन निर्णय क्रं. एसएफएस-२०१६/प्र.क्र.१४२/एसएम-२, दि.१४.७.२०१७
३) कार्यालयाचे पत्र जा.क्रं.शिऊसं/माध्य-३०३/प्रथम मान्यता/पुवि/२०२०/१३७३ दिनांक १२/२/२०२०

उपरोक्त विषयान्वये महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा स्थापना व विनियिम अधिनियम २०१२ अंतर्गत नविन शाळा स्थापन करणे तसेच विदयमान शाळेचा दर्जावाढ साठी प्रथम मान्यता देणेसंदर्भात माध्यमिक शाळा संहिता मधील नियम ४.१ मध्ये शाळेच्या मान्यतेच्या पहिल्या वर्षानंतर समुचित प्राधिका-याकडून (शिक्षणाधिकारी) पुढील चार वर्षाकरीता शाळेची मान्यता वर्षा-वर्षाने तात्पुरती चालू ठेवण्यात येईल. मात्र अशा शाळांनी नियम ३ मध्ये नमूद केलेल्या अटींची पूर्तता करणे चालू ठेवले पाहिजे. नियम ४.२ मध्ये पाच वर्षांच्या कालावधीनंतर त्यांना कायमपणे मान्यता देण्याचा उपसंचालकास विचार करता येईल. मात्र त्यांनी नियम ३ मध्ये घालून दिलेल्या शर्ती पुर्ण करणे चालू ठेवले पाहिजे. तसेच संदर्भीय शासन निर्णयातील मुद्दा क्रं.२.५.३ माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा : **LOI** प्राप्त झाल्यावर शासनाने विहित केलेल्या सर्व अटी पूर्ण करुन शाळा सुरु करण्याचा प्रस्ताव संबंधित शैक्षणिक संस्थेने आपले कार्यालयाकडे सादर माध्यमिक शाळा संहिता मधील नियम ४.१ व ४.२ तसेच संदर्भीय शासन निर्णयामधील मुद्दा क्रं. २.५.३ नुसार प्रथम मान्यता देण्याबाबत कार्यवाही करणेबाबत आपणास संदर्भीय क्रं. ३ अन्वये कळविलेले त्यानुसार आपले स्तरावरुन प्रथम मान्यता प्रस्तावाबाबत कार्यवाही करणेबाबत आपणास अलाहिदा कळविण्यात आलेले आहे.

तद्नंतर माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३.२ मधील शर्तीची पूर्तता करण्याच्या व तपासणी अहवालात नमूद केलेल्या अटींची पूर्तता तसेच शासन परवानगी आदेशातील अटी व शर्ती पूर्ण करण्याच्या अटीवर नियम क्रं. ५.१ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार आपल्या जिल्हयाच्या स्वयं अर्थसहाय्यित तत्वावरील शाळेस खात्याची मान्यता देण्यात येईल. याप्रमाणे आपले जिल्हयातील सर्व शाळांना अवगत करण्यात यावे.

( वैजनाथ खांडके )
प्र.शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे १

प्रत - माहितीस्तव सविनय सादर
१) मा. आयुक्त (शिक्षण) शिक्षण आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२) मा. शिक्षण संचालक, माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे